स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /          /25-26**

दि. २३/०१/२०२६

प्रेसनोट

वसई-विरार शहर महानगरपालिकेत गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस) प्रतिबंध कायदा १९९४ सुधारित २००३ तसेच वैद्यकीय गर्भधारणा समाप्ती अधिनियम १९७१ ची अंमलबजावणी वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत करण्यात येते.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाला मिळालेल्या माहितीनुसार "केअर ॲन्ड क्युअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल", १०१-१०६, कामधेनू सीएचएस लि., पहिला मजला, एसबीआय बँकेसमोर, आचोळे रोड, नालासोपारा (पुर्व) येथे अवैधरित्या गर्भपात करीत असल्याची माहिती कार्यालयात प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने मा. आयुक्त श्री. मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.), मा. अतिरिक्त आयुक्त (वैद्यकीय आरोग्य) श्री. दिपक सावंत व मा. उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य) श्रीम. स्वाती देशपांडे ह्यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ. भक्ती चौधरी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर पांढरे व डॉ. कृष्णा गोसावी यांना सदर रुग्णालयाच्या तपासणीसाठी पाठविण्यात आले होते.

दि.२२/०१/२०२६ रोजी वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर पांढरे व डॉ. कृष्णा गोसावी यांनी स्टिंग ऑपरेशन करुन "केअर ॲन्ड क्युअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, १०१-१०६, कामधेनू सीएचएस लि., पहिला मजला, एसबीआय बँकेसमोर, आचोळे रोड, नालासोपारा (पुर्व) येथे वैद्यकीय गर्भधारणा समाप्ती अधिनियम १९७१ अंतर्गत विना परवाना व गर्भपाताच्या गोळ्या देण्याचा कोणताही अधिकार नसताना तसेच शैक्षणिक अर्हता नसताना अवैधरित्या रुग्णाला गर्भपात औषधे दिल्या प्रकरणात सदर रुग्णालयाचे संचालक डॉ. चंद्रकांत शंभुनाथ मिश्रा व अरुण शुक्ला तसेच संतोष भवन, वालईपाडा येथील कुशल क्लिनिकचे डॉ.संजीव सिंग हे दोषी आढळल्याने वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी द्वारा आचोळे पोलिस ठाणे येथे प्रथम माहिती अहवाल (FIR) दाखल करण्यात आला.

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात बेकायदेशीर पीसीपीएनडीटी केंद्र / गर्भलिंग निदान करीत असलेले केंद्र व अवैध एमटीपी केंद्रांवर आळा घालण्यासाठी वैद्यकीय आरोग्य विभाग कार्यरत राहणार असून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की बेकायदेशीर पीसीपीएनडीटी केंद्र / गर्भलिंग निदान करीत असलेले केंद्र व अवैध एमटीपी बाबत तक्रार वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, वैद्यकीय आरोग्य विभाग, सातवा मजला, म्हाडा कॉलनी, विरार (पश्चिम) येथे नोंदविण्यात यावी. तसेच याबाबतची माहिती आमची मुलगी वेबसाईट (www.amchimulgimaha.in) व हेल्पलाईन क्रमांक. १८००- २३३-४४७५, १०४ ही टोलफ्री दुरध्वनी क्रमांकावर देण्यात यावी. आपण दिलेल्या माहितीबाबत गोपनीयता ठेवण्यात येईल.

वैद्यकीय आरोग्य विभाग

वसई-विरार शहर महानगरपालिका